# वसई-विरार शहर महानगरपालिका
## निवडणूक विभाग

दि.३१/०१/२०२२

## प्रेसनोट

## वसई विरार शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक – २०२२

मा.राज्य निवडणूक आयोगाने वसई विरार शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२०२२ च्या अनुषंगाने निवडणूक प्रारूप प्रभागाच्या सीमांची प्रसिद्धी, त्यावरील हरकती व सूचना मागविणे, सुनावणी देणे इ. बाबतचा कालबद्ध कार्यक्रम जाहीर केलेला आहे. त्याअनुषंगाने नागरिक/रहिवाशांकरिता प्रारूप अधिसूचना, प्रारूप प्रभाग रचनेचे नकाशे, सर्व प्रारूप प्रभागांच्या व्याप्ती व चतुर्सिमा (उत्तर, पूर्व, दक्षिण, पश्चिम) इ. संचिका सर्व प्रभाग कार्यालये (१.प्रभाग समिती 'ए' कार्यालय, बोळींज, विरार (प.), २.प्रभाग समिती 'बी' कार्यालय, नालासोपारा (प.), ३.प्रभाग समिती 'सी' कार्यालय, विरार (पु), ४.प्रभाग समिती 'डी' कार्यालय, आचोळे नालासोपारा (पू), ५.प्रभाग समिती 'ई' कार्यालय, वृंदावन गार्डन, नालासोपारा (प.), ६.प्रभाग समिती 'एफ' कार्यालय, पेल्हार, नालासोपारा(पू.), ७.प्रभाग समिती 'जी' कार्यालय, वालीव,वसई (पू), ८.प्रभाग समिती 'एच' कार्यालय, नवघर,वसई (प.), ९.प्रभाग समिती 'आय' कार्यालय, वसई गाव, वसई (प.)) तसेच वसई विरार शहर महानगरपालिका मुख्यालय, विरार(पू.) येथील **निवडणूक कार्यालयात दि.०१/०२/२०२२** पासून ठेवण्यात येतील. यावरील **हरकती व सूचनांच्या स्वीकृतीसाठी दि.०१/०२/२०२२ ते दि.१४/०२/२०२२ दु.०३.०० वाजेपर्यंतचा** कालावधी विहित केलेला असून उपरोक्त प्रभाग समिती कार्यालये व मुख्यालय, विरार येथे **हरकती व सूचना स्वीकृती कक्ष** स्थापन करण्यात आलेला आहे.

या व्यतिरिक्त प्रारूप अधिसूचना, प्रारूप प्रभाग रचनेचे नकाशे, सर्व प्रारूप प्रभागांच्या व्याप्ती व चतुर्सिमा (उत्तर, पूर्व, दक्षिण, पश्चिम) इत्यादी संचिका मा.जिल्हाधिकारी कार्यालय(पालघर), उपविभागीय अधिकारी कार्यालय (वसई), तहसीलदार कार्यालय (वसई), वसई विरार शहर महानगरपालिकेचे अधिकृत संकेतस्थळ www.vvcmc.in वर देखील प्रसिद्ध करण्यात आलेले असून या ठिकाणी केवळ अवलोकनार्थ सदर संचीका उपलब्ध आहेत.

टीप : हरकती व सूचना या महानगरपालिका मुख्यालय येथील निवडणूक कार्यालय व प्रभाग समिती येथील निवडणूक कक्ष येथेच स्वीकारल्या जातील याची नोंद घ्यावी.

**निवडणूक विभाग**
**वसई विरार शहर महानगरपालिका**